पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

सभावृत्तांत

कार्यपत्रिका क्रमांक ४

दिनांक: १५/०७/२०१५ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जुलै २०१५ ची मासिक सभा बुधवार दिनांक १५/०७/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा.सौ.काळभोर वैशाली जालिंदर - सभापती

२. मा.उल्हास शेट्टी

३. मा. भारती फरांदे

४. मा. आर.एस.कुमार

५. मा. राजू मिसाळ

६. मा. नंदा विकास ताकवणे

७. मा.नेटके सुमन राजेंद्र

८. मा. भोंडवे संगिता राजेंद्र

९. मा. प्रसाद शेट्टी

१०. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर -क्षेत्रीय अधिकारी, श्री. फारुक शेख, कार्यकारी अभियंता स्थापत्य , श्री. मिलींद कपिले- कार्यकारी अभियंता विद्युत, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.मोहन करमरकर, - उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.सुनिल वाघुंडे, श्री.अनिल शिंदे , श्री. संजय भोसले , श्री. बन्सल एच.पी. उपअभियंता स्थापत्य, श्रीम.लता बाबर - उपअभियंता विद्युत, श्री.पांडुरंग जाधव, लेखाधिकारी, श्री.एम.एम.शिंदे - सहा. आरोग्याधिकारी, श्री.जन्नु, कनिष्ठ अभियंता जलनि:सारण, श्री.बंडगर, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, श्री. आर.डी. सुर्यवंशी, कनिष्ठ अभियंता बी.आर.टी.एस., श्री. ए.आर.हरीचंद्रे , सहाय्यक उद्यान निरीक्षक उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननीय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १ मा. आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव.
सेक्टर २६ मधील रस्त्यांचे नामकरण करणे.

विषय क्रमांक २ मा. नंदा विकास ताकवणे यांचा प्रस्ताव.
सेक्टर २७ येथील चौकाचे नामकरण करणे.

विषय क्रमांक ३ मा. सविता सुरेश साळुंके यांचा प्रस्ताव.
मोरवाडी प्रभाग क्र. २७ मधील रस्त्यांचे नामकरण करणे.

विषय क्रमांक ४ मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा प्रस्ताव.
प्रभाग क्र. १९ मधील बस टर्मिनल किवळे (मुकाई चौक) नामकरण करणे.

अ) दिनांक १५/०७/२०१५ रोजी घेणेत आलेल्या माहे जुलै २०१५ चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक ४) कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १३ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : १५/०७/२०१५ | विभाग | : स्थापत्य |
| सूचक | : मा. सुमन राजेंद्र नेटके | अनुमोदक | : मा.बाळासाहेब जयवंत तरस |

संदर्भ: मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा प्रस्ताव .

मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो. समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास “हस्तीमल शेठ गादिया मार्ग” असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १४ | विषय क्र. | : २ |
| दिनांक | : १५/०७/२०१५ | विभाग | : विद्युत |
| सुचक | : मा.भारती फरांदे | अनुमोदक | : मा. सुमन नेटके |

संदर्भ : विद्युत विभागाकडील दि. ३/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

सन २०१५-१६ चे अ अंदाजपत्रकात स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर र.रु. ३,०६,००,०००/- (अक्षरी रु. तीन कोटी सहा लाख फक्त) इतकी तरतूद केलेली आहे. सदरचे लेखाशिर्षकावर माहे मे २०१५ अखेर रु. ५७,५०,७७५/- इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. यामध्ये पुढील काळात माहे मार्च २०१६ अखेर कर्मचारी वेतन भत्ते, कर्मचारी यांची वेतनवाढ इ. पगार वाढीचा विचार करता यापूर्वी झालेल्या खर्चासह २,४०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर करणेत आलेली तरतुद रु. ३,०६,००,०००/- मधून अस्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर रु. २,५०,०००/- तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्र. | : १५ | विषय क्र. | : ३ |
| दिनांक | : १५/०७/२०१५ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. प्रसाद शेट्टी | अनुमोदक | : मा.नंदा ताकवणे |

संदर्भ : मा. जावेद शेख यांचा दि. २ जुलै २०१५ रोजीचा प्रस्ताव.

दत्तवाडी - विठ्ठलवाडी प्रभाग क्रमांक १५ मध्ये विठ्ठलवाडी दत्तवाडी मुख्य रस्त्यालगत वायकर चाळी शेजारी महापालिकेचे अनेक वर्षापासून शौचालय आहे. सदर शौचालयाचे सुलभमध्ये रुपांतर करणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक : १६ विषय क्र : ४

दिनांक : १५/०७/२०१५ विभाग : स्थापत्य

सुचक : मा. सविता साळुंके अनुमोदक : मा. भारती फरांदे

संदर्भ : मा. जावेद शेख यांचा दि. १३ जुलै २०१५ रोजीचा प्रस्ताव.

दत्तवाडी – विठ्ठलवाडी प्रभाग क्र. १५ मध्ये लालबहादुर शास्त्री नगर या परिसरातून वाहणा-या ओढयावर पूल असून सदर पुलास " लालबहादुर शास्त्री " पूल हे नाव देणेबाबतचा विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक : १७ विषय क्रमांक : ५

दिनांक : १५/०७/२०१५ विभाग : स्थापत्य

सूचक : मा. आर.एस.कुमार अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा. आर.एस. कुमार यांचा दि. १५/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

गणेश तलाव से. २६ परिसरातील रस्त्यांचे खालीलप्रमाणे नामकरण करणे.

गणेश तलावाच्या बाजूने जाणा-या रस्त्याला " गणेश तलाव मार्ग "असे नांव देणे.व दुर्गेश्वर पथ आणि गणेश तलाव मार्ग यांना जोडणा-या रस्त्यास " स्वा. सै. वि. ना. आपटे पथ " असे नांव देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक : १८ विषय क्रमांक : ६

दिनांक : १५/७/२०१५ विभाग : स्थापत्य
सूचक : मा.नंदा ताकवणे अनुमोदक : मा. राजु मिसाळ

संदर्भ : मा. नंदा ताकवणे यांचा दि. १५/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

सेक्टर २७ येथील भेळ चौक ते संभाजी चौक दरम्यान असलेल्या चौकास " कै. विजय नाईकरे चौक " असे
नांव देणेबाबत विचार करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : १९ विषय क्रमांक : ७

दिनांक : १५/०७/२०१५ विभाग : स्थापत्य
सुचक : मा.सौ. सविता साळुंके अनुमोदक : मा. नेटके सुमन राजेंद्र

संदर्भ: मा. सौ.सविता सुरेश साळुंके यांचा दि . १५/७/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २७ मोरवाडी येथील रस्त्यांचे खालीलप्रमाणे नामकरण करणेबाबत विचार करणे.

म्हाडा परिसरातील संत ज्ञानेश्वर कॉलनी म्हाडातील कमानी समोरील रस्त्याला "स्व. नंदा ज्ञानदेव भोजने पथ" , मोरवाडी येथील मारुती भिकू कापसे उद्यानामागील रस्त्यास " कै. कु. फरान आसीफ शेख पथ " व मोरवाडी येथील लालटोपीनगर झोपडपट्टीस " सोपान भाऊ लुकर उर्फ लालटोपीनगर " असे नामकरण करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक : २० विषय क्रमांक : ८

दिनांक : १५/०७/२०१५ विभाग : स्थापत्य

सुचक : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे अनुमोदक : मा. बाळासाहेब तरस

संदर्भ: मा. सौ.संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ किवळे (मुकाई चौक) मधील बस टर्मिनलचे " मुकाई बस टर्मिनील " असे नामकरण करणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(सौ.वैशाली जालिंदर काळभोर)
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/१९५/२०१५
दिनांक :१०/०८/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती